mgR/2551
5/6/13
प्र. आभि. (वि.नि.)

प्रशा/विनि/७
२०१३-१४

महोदय, उचित कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

३/६/१३

# कांदळवनाच्या (Mangroves) क्षेत्राचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एस-१०/२०१२/प्र.क्र.३२६/फ-३.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ मे, २०१३.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१०/प्र.क्र.९२/फ-१. दिनांक १.११.२०११.

२) शासन निर्णय क्र. एस-१०/२०११/अनौ.-७४/प्र.क्र.४५४/फ-३, दिनांक ४.०१.२०१२.

३) शासन निर्णय क्र. एस-१०/२०११/अनौ.-७४/प्र.क्र.४५४/फ-३, दिनांक २३.०२.२०१२.

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१२/जमिन/३/मॅंग्रोव्ह/प्र.क्र.१७८(१२-१३)/१०४१, दिनांक २५.०२.२०१३.

**प्रस्तावना :-**

रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ६.१०.२००५ च्या आदेशानुसार राज्यातील कांदळवनाचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी प्रभावी पाऊले उचलण्याचे निदेश दिले होते. त्यानुषंगाने संदर्भ क्र.१ आणि २ येथील शासन निर्णयानुसार कांदळवनाचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धन प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये एक स्वतंत्र कांदळवन कक्ष (Mangrove Cell) गठीत करण्यात आलेला आहे. सदर कांदळवन कक्षात आजमितीस एकूण ४० अधिकारी / कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन निर्णयानुसार कांदळवन कक्षाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ठरविण्यात आलेल्या आहेत.

२. फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया डेहराडून यांच्या सन २००९ च्या अहवालानुसार राज्यात जिल्हानिहाय कांदळवन क्षेत्राची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | कांदळवनाखालील क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|
| १ | मुंबई शहर | २०० |
| २ | मुंबई उपनगर | ४३०० |
| ३ | रायगड | ६२०० |
| ४ | रत्नागिरी | २३०० |
| ५ | सिंधुदुर्ग | ३०० |
| ६ | ठाणे | ५३०० |
| एकूण | | १८६०० |

३. वरील प्रमाणे राज्यात कांदळवन क्षेत्राची व्याप्ती, कांदळवनांचे पर्यावरणीय महत्व, सुनामी, फयान तसेच सायक्लोन सारख्या नैसर्गिक आपत्तीपासून बचाव करण्यासंदर्भात कांदळवनाचे महत्व इ. विचारात घेता संदर्भ क्र.३ नुसार प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांनी कांदळवनाचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी आवश्यक उपाय योजना करण्यासंदर्भात एक प्रस्ताव सादर केला आहे. उक्त पार्श्वभूमीवर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तसेच मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांचेबरोबर वेळोवेळी झालेल्या विचार विनिमयानुसार राज्यातील कांदळवनाचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

४. कांदळवनाचे अधिक प्रभावी संरक्षण तसेच कांदळवन कक्षाचे बळकटीकरण करण्यासाठी कांदळवन क्षेत्राच्या संरक्षणाकरिता नियुक्त ठाणे वन विभागातील १ वनक्षेत्रपाल, ७ वनपाल आणि १४ वनरक्षक एवढे मनुष्यबळ कांदळवन कक्षाकडे वर्ग करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त ठाणे वन विभागातील सहायक वनसंरक्षक, अतिक्रमण निर्मूलन, मुरबाड यांची सेवा कांदळवन कक्षाकडे वर्ग करण्यात येत आहे.

५. **मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील कांदळवनांचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी व्यवस्था**

५ (१) मॅंग्रोव्हखालील क्षेत्र राज्यातील साधारणपणे संपूर्ण किनारपट्टीवर आढळत असले तरी मुंबई, नवी मुंबई व ठाणे महानगर परिसरातील कांदळवन क्षेत्र संरक्षणाच्या दृष्टीने अतिसंवेदनशील असल्याने उक्त क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनासाठी कांदळवन कक्षाच्या अखत्यारित मुंबई कांदळवन संधारण घटक (Mumbai Mangrove Conservation Unit) गठीत करण्यात येत आहे.

५ (२) उक्त मुंबई कांदळवन संधारण घटक (MMCU) च्या योग्य संचालनासाठी विभागीय वन अधिकारी दर्जाचा एक अधिकारी हा सदर कांदळवन कक्षाकडे वर्ग करण्यात येत आहे. सदर विभागीय वन अधिकारी, मॅंग्रोव्ह हे मुंबई कांदळवन संधारण घटक (MMCU) चे प्रमुख म्हणून राहतील.

मुंबई कांदळवन संधारण घटक (MMCU) ची संरचना खालीलप्रमाणे राहिल :

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय वन अधिकारी (मॅंग्रोव्ह) | घटक प्रमुख. |
| २) | सहायक वनसंरक्षक | १ |
| ३) | वनक्षेत्रपाल | ३ |
| ४) | वनपाल | ७ |
| ५) | वनरक्षक | १८ |

५ (३) मुंबई कांदळवन संधारण घटक (MMCU) ची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील :

१) मुंबई, ठाणे व नवी मुंबई महानगर परिसरातील कांदळवन क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करणे.

२) केंद्र शासन, राज्य शासन तसेच इतर बाहय स्त्रोतातून मिळणाऱ्या अर्थसहाय्याकडून कांदळवन विभागामार्फत संवर्धनाच्या विकासात्मक कामांची अंमलबजावणी करणे.

३) त्यांचे कार्यक्षेत्रातील कांदळवन क्षेत्राशी निगडित विविध स्तरावरील न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

६. **मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे महानगर व्यतिरिक्त अन्य कांदळवनांचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी व्यवस्था**

६ (१) तटीय क्षेत्रावर असलेले डहाणू, रोहा, अलिबाग वनविभागापैकी प्रत्येकी १ सहायक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण व तटीय क्षेत्रातील जैव विविधतेबाबतच्या संपूर्ण कामासाठी नोडल ऑफिसर म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. सदर नोडल ऑफिसर त्यांच्याकडे असलेल्या इतर नियमित कामकाजा बरोबर मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशांचे पालन करतील. संबंधित वन विभागातील कांदळवन व जैविक विविधतेशी संबंधित समन्वय करण्याची संपूर्ण जबाबदारी नोडल अधिकाऱ्याची राहील.

६ (२) सावंतवाडी वनविभागात विशिष्टपणे UNDP प्रकल्प आणि मालवण सागरी अभयारण्य यांचे कामकाज असल्याने हया सर्व कामासाठी सहायक वनसंरक्षक दर्जाचे एक विशेष अधिकारी - तटीय

क्षेत्र नियुक्त करण्यात येत आहे. UNDP प्रकल्प आणि मालवण सागरी अभयारण्य यांचे कामकाज, कांदळवन संरक्षण व तटीय क्षेत्रातील जैव विविधतेबाबतचे संपूर्ण कामही विशेष अधिकाऱ्यांची जबाबदारी राहील त्यांच्याकडे वन विभागाची अन्य जबाबदारी राहणार नाही. सावंतवाडी वन विभागातील तटीय क्षेत्रात असलेले कुडाळ, कणकवली आणि सावंतवाडी या वनक्षेत्राचे वनक्षेत्रपाल व कांदळवन कक्षाचे मालवण येथील वनक्षेत्रपाल वरील प्रकारच्या कामासाठी "विशेष अधिकारी - तटीय क्षेत्र" यांच्या निदर्शनाखाली काम करतील.

६ (३) वरीलप्रमाणे नियुक्त केलेले प्रत्येक नोडल ऑफिसर आणि " विशेष अधिकारी - तटीय क्षेत्र " यांचे गोपनीय अहवाल संबंधित वन विभागाचे उप वनसंरक्षक लिहितील. त्यांचे पुनर्विलोकन मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष करतील.

६ (४) उपरोल्लिखित नोडल अधिकारी, सहायक वनसंरक्षक यांचे कार्यक्षेत्र पुढीलप्रमाणे राहतील :-

| अ.क्र. | वन विभाग | नोडल ऑफिसर / विशेष अधिकारी यांचे सध्याचे पद | नोडल ऑफिसर / विशेष अधिकार म्हणून कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | डहाणू | सहायक वनसंरक्षक (दक्षता) | डहाणू, बोर्डी, बोईसर, पालघर, सफाळे, दहिसर या वनक्षेत्राचे तटीय क्षेत्र. |
| २ | अलिबाग | सहायक वनसंरक्षक (अतिक्रमण निर्मूलन) | उरण, अलिबाग, पनवेल, पेण, नागोठाणे, वडखळ या वनक्षेत्राचे तटीय क्षेत्र. |
| ३ | रोहा | सहायक वनसंरक्षक (संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन) | मुरुड, श्रीवर्धन, रोहा, म्हसळा, माणगांव या वनक्षेत्राचे तटीय क्षेत्र. |
| ४ | सावंतवाडी | सहायक वनसंरक्षक (खात्यामार्फत कुप तोड) | सिंधुदूर्ग जिल्हयातील संपूर्ण तटीय क्षेत्र |

६ (५) विभागीय वन अधिकारी, चिपळूण हे रत्नागिरी जिल्हयातील संपूर्ण तटीय क्षेत्राचे नोडल अधिकारी असतील.

७. मॅंग्रोव्हशी संबंधित क्षेत्रीय कामासाठी प्राप्त होणारे सर्व अनुदान यापुढे कांदळवन कक्षाकडे वर्ग करण्यात येतील आणि मुख्य वनसंरक्षक,कांदळवन कक्ष आवश्यकतेनुसार सदर अनुदानाचे पुढील वाटप संबंधित वन विभागांना करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

( विजय साबळे )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (गृह विभाग), मंत्रालय, मुंबई ३२
२) अपर मुख्य सचिव (महसूल), म[redacted]३२.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) सचिव (पर्यटन) मंत्रालय, मुंबई-३२

५) सचिव (पर्यावरण), मंत्रालय, मुंबई ३२.

६) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

७) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य, पुणे,

८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

९) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१०) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

११) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१३) अपर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.

१४) पोलीस आयुक्त, मुंबई.

१५) आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.

१६) आयुक्त, ठाणे महानगर पालिका, ठाणे.

१७) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगर पालिका, कल्याण.

१८) आयुक्त, नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई.

१९) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगर पालिका, भाईंदर.

२०) आयुक्त, भिवंडी महानगर पालिका, भिवंडी.

२१) आयुक्त, उल्हासनगर महानगर पालिका, उल्हासनगर.

२२) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.

क्र. प्रअ/७०१४/विनि/साधारण दि. २९/०६/२०१३

अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर)/पूर्व उपनगरे/प. उपनगरे/प्रकल्प

महापालिका उपायुक्त परिमंडळ - ____

महापालिका आयुक्तांचे उपायुक्त

सहायक आयुक्त ____ विभाग

प्रत माहितीकरिता सादर.

प्रशासकीय अधिकारी
(विकास नियोजन) - १
२०/६/१२